# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २८/४/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ५९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/३/२०२० ते दि.३१/३/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/७६ दि.१७/४/२०२० चे पत्र.

**संकिर्ण**

**विषय क्र. ६०**

पुणे शहरामध्ये केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ दि.१३/३/२०२०/ महाराष्ट्र कोवीड १९ उपाययोजना नियम २०२०/ मा.विभागीय आयुक्त परिपत्रक दि.९/३/२०२० व साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेबाबतची अधिसूचना तसेच दि.१४/३/२०२० रोजी विभागप्रमुख कोवीड १९ कंटेन्मेट प्लॅनबाबतची झालेली माहितीच्या अनुषंगाने उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या परिस्थितीवेळी आपत्कालिन परिस्थितीमध्ये लागण झालेल्या रुग्णांच्या व संवशयीत रुग्णांच्या कोरोनटाईन कक्षामध्ये करण्यात आलेल्या विद्युत विषयक कामे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते ७ नुसार ठेकेदारांची देयके आदा करणेस व त्यानुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/१६ दि. १७/४/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६१**

पुणे पेठ बाणेर स.नं. ५२/४/१/२६ येथील प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने आरक्षित ४५५ चौ.मी. जागेचा टी.डी.आर. देणे पोटी मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत दि.१६/५/२०१९ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या क्षेत्राची, तडजोडीने ताब्याची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने चालू असलेल्या भूसंपादनातील (एलए–६०३) प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने आरक्षित ४५५ चौ.मी. क्षेत्र भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत व तेवढया क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांना कळविणेत येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुसंपादन/१७ दि. १७/४/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**